# 2023-24

## विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत राष्ट्रीय छात्र सेनेमधून देशसेवेचे बाळकडू घ्यावे : वाय.पी. खांडूरी

**कोल्हापूर** : समाज निर्मितीमध्ये आजचे विद्यार्थी अत्यंत सक्षमपणे भूमिका बजावू शकतात आणि देश सेवेसाठी आवश्यक असणारी ऊर्जा एनसीसीच्या माध्यमातून सत्कारणी लागू शकते. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना शिक्षणासोबत राष्ट्रीय छात्र सेनेमधून देशसेवेचे बाळकडू घ्यावे. विद्यार्थ्यांना सक्षम अधिकारी बनण्याची संधी येथे उपलब्ध करून दिली जाते, असे मत महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख मेजर जनरल वाय. पी. खांडुरी यांनी मांडले. ते विवेकानंद महाविद्यालयातील कार्यक्रमप्रसंगी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीय छात्र सेना हे संपूर्ण जगातील सुसज्ज सर्वात मोठे संघटन आहे. राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सक्षम जबाबदार नागरिक बनविण्यासाठीचे प्रशिक्षण दिले जाते आणि सोबतच राष्ट्रप्रेम राष्ट्रीय एकात्मता छात्रांमध्ये बाणवली जाते.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी राष्ट्रीय छात्र सेना एक आदर्श सैनिकी शिस्त लावणारी यंत्रणा आहे. जीवनात यशस्वी आवश्यक असणारे नेतृत्वगुण राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून विकसित केले जातात असे मत मांडले. महाविद्यालयात अतिथी स्वागतप्रसंगी गार्ड ऑफ हॉनर अंडर ऑफिसर प्रतीक हवळे यांनी दिला. या कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी ग्रुप हेडक्वार्टर्सचे प्रमुख ब्रिगेडियर अभिजीत वाळवे एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, ५ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे सुभेदार मेजर एस. एम. भोसले, ट्रेनिंग जेसीओ प्रशांत जमनिक जेसीओ राजाराम आढाव, हवालदार दया पवार यांनी केले.

**OPPORTUNITIES THROUGH NCC LT.GEN Y P KHANDURI**

# सार्जंट साक्षी चौगुलेची चेन्नईतील कँपसाठी निवड



**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालयातील ५ महाराष्ट्र बटालियन युनिटमधील सार्जंट साक्षी चौगुले हिची निवड ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी चेन्नई येथील प्रशिक्षणासाठी झालेली आहे. भविष्यकालीन सैन्य दलातील अधिकारी होण्यासाठीचे प्रशिक्षण चेन्नई येथे दिले जाते.

साक्षी चौगुले हिची प्रशिक्षणासाठीची निवड बटालियन आणि ग्रुप लेवलमधील चाचणी परीक्षेतून झालेली आहे. या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी प्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, कॅप्टन सुनिता भोसले, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे ५ महाराष्ट्र बटालियन कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल विकास पवार, सुभेदार मेजर सुरेश भोसले, ट्रेनिंग जेसीओ प्रशांत जमनीक आणि पालक यांचे मार्गदर्शन लाभले.

**SELECTION FOR OTA CHENNAI**

सकाळ दि.05/08/2023



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलातर्फे आपत्ती व्यवस्थापनविषयक प्रात्यक्षिके सादर केली. यात सहभागी विद्यार्थी, शिक्षक.

# विवेकानंद महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिके

कोल्हापूर, ता. ४ : विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलातर्फे आपत्ती व्यवस्थापनविषयक प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनातर्फे त्याचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्ह्यातील नागरिकांना प्रत्येक पावसाळ्यात महापुराच्या समस्येला सामोरे जावे लागते. महापूर आल्यानंतर उद्भवणाऱ्या समस्येसह अन्य संकटातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कक्षातर्फे सुरक्षिततेची सेवा पुरविली जाते. एखादी आपत्ती घडल्यापासून ते आपत्तीबाधितांना सुरक्षितस्थळी पोचवण्यापर्यंतच्या काळात काय करावे आणि करू नये, याबाबत ५ महाराष्ट्र बटालियन पुणेचे डेप्युटी कमांडंट अशोक कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली टीमने प्रात्यक्षिके दाखवली.

या वेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी नैसर्गिक आणि मानवी आपत्तीच्या काळात एनडीआरएफच्या तुकड्या जलद गतीने साह्यासाठी उपलब्ध असतात. त्यावेळी आपणही त्यांना सर्वतोपरी सहकार्य करून प्रत्येकाची सुरक्षिततेच्या काळजी घ्यावी, असे आवाहन केले. एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**NATIONAL DISASTER RESPONSE FORCE DEMONSTRATION**



पुढारी ३

सोमवार, ७ ऑगस्ट २०२३

## 'विवेकानंद'मध्ये 'एनडीआरएफ'ची प्रात्यक्षिके

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलामार्फत नैसर्गिक आपत्ती व महापूर आल्यावर घ्यावयाची काळजी, याबाबतची प्रात्यक्षिके 'एनडीआरएफ'च्या महाराष्ट्र बटालियन पुणेचे डेप्युटी कमांडंट अशोक कुमार व याच्या टीमने दाखविली. जिल्ह्यातील नागरिकांना पावसाळ्यात महापुराच्या समस्येला सामोरे जावे लागते. अशा समस्येतून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत सुरक्षिततेची सेवा पुरविली जाते. आपत्ती बाधित लोकाना सुरक्षित स्थळी पोहोचवण्यापर्यंतच्या काळात काय करावे यासंबंधातील प्रात्यक्षिके यावेळी दाखविण्यात आली.यावेळी प्राचार्य डॉ.आर आर कुंभार उपस्थित होते. एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले.

**NATIONAL DISASTER RESPONSE FORCE DEMONSTRATION**

दै. पुण्यनगरी दि. 17.08.2023



# विवेकानंद कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी विश्वबंधुत्वाची शिकवण आपल्या प्रार्थनेतून दिली. त्याचे अवलंबन युवकांनी करावे, विद्यार्थ्यांमधील ज्ञानज्योत प्रज्वलित करण्याचे काम गुरुदेव कार्यकर्त्यांनी करावे, असे विचार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी ध्वजारोहण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मांडले. यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, तसेच संस्था परिसरातील शाखाप्रमुख उपस्थित होते.

विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. समारंभात विवेकानंद कॉलेजमधील पुस्तक लेखक, नेट, सेट, पीएच.डी. पदवीप्राप्त प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. एन. आर. सणगर, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, आर. बी. जोग यांनी केले.

**INDIAN INDEPENDENCE DAY**



सकाळ दि. 31/08/2023

# विवेकानंद महाविद्यालयात आगळे रक्षाबंधन

कोल्हापूर : सर्व मुलींनी आपल्यातील स्त्रीशक्ती जागवून अडचणीच्या वेळी एकमेकीला मदत करायला हवी, याची जाणीव करून देण्यासाठी मुली आणि छात्रसैनिक मुलींना एकमेकींना राख्या बांधल्या. राष्ट्रीय छात्र सेना, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सनराईज, रोटरॅक्ट क्लबतर्फे विवेकानंद महाविद्यालयात हा आगळा रक्षाबंधनाचा सण साजरा झाला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास 'सनराईज'चे अध्यक्ष चंदन मिरजकर, कार्यवाह डॉ. भरत कोटकर, खजानीस नवीन उदियापुरिया, मेजर प्रा. डॉ. रूपा शहा उपस्थित होते. सहयोगी एनसीसी अधिकारी कॅप्टन सुनिता भोसले यांनी स्वागत केले. रोटरॅक्ट क्लबची शाखा विवेकानंद महाविद्यालयातील मुलींसाठी सुरू केलेल्या सुचनेला तयारी दर्शविली. डॉ. कोटकर यांनी आभार मानले. सहा महाराष्ट्र एनसीसी बटालियनच्या विवेकानंद तसेच कमला महाविद्यालयातील मुली, केआयटीमधील रोटरॅक्ट क्लबच्या सदस्य असणाऱ्याया मुली, पाच महाराष्ट्र बटालियन एनसीसीमधील छात्रसैनिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

RAKSHABANDHAN

पुण्यनगरी दि. 17/09/2023

## विवेकानंद कॉलेजतर्फे सायकल रॅली

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांकडून आंतरराष्ट्रीय ओझोन दिनानिमित्त सायकल रॅली काढण्यात आली. ही रॅली विवेकानंद कॉलेज, धैर्यप्रसाद हॉल, एसटी स्टँड, कलेक्टर ऑफिस यामार्गे काढण्यात आली. रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. रॅलीचे आयोजन लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले, अंडर ऑफिसर गायत्री बोभाटे, सार्जंट साक्षी चौगुले, सार्जंट आशीष पाटील यांनी केले. कमांडिंग ऑफिसर कर्नल विकास पवार, सुभेदार मेजर तुकाराम भोसले, ट्रेनिंग जेसीओ प्रशांत जमनिक यांचे मार्गदर्शन लाभले.

INTERNATIONAL OZON DAY

# 'विवेकानंद'च्या प्रेमराज पाटीलची राष्ट्रीय गिर्यारोहण शिबिरासाठी निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील एनसीसीचा विद्यार्थी प्रेमराज पाटील याची ग्वाल्हेर येथे होणाऱ्या राष्ट्रीय गिर्यारोहण शिबिरासाठी निवड झाली. हे राष्ट्रीय शिबिर १५ दिवसांचे असून गिर्यारोहणासाठी आवश्यक खडतर प्रशिक्षण राष्ट्रीय छात्र सेना मध्य प्रदेश, छत्तीसगड विभागामार्फत दिले जाणार आहे. शारीरिक व मानसिक सुदृढतेच्या वेगवेगळ्या चाचण्यांमधून विद्यार्थ्यांची निवड एनसीसीमार्फत झाली आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले, पाच महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे सुभेदार मेजर सुरेश भोसले, ट्रेनिंग जेसीओ प्रशांत चमनिक, सुभेदार राजाराम आढाव यांचे मार्गदर्शन लाभले.

SELECTION FOR MOUNTAINEERING